श्रीज्ञानदेवविरचित

भक्तराजग्रंथ.

हें पुस्तक जुनाट हस्तलिखित प्रतीवरून
यथामति शुद्धकरून मुमुक्षुजनांच्या
उपयोगाकरितां

आबाजी रामचंद्र सावंत.

यांणीं

आपल्या 'श्रीरामतत्त्वप्रकाश' छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केलें.

७०१८८

बेळगांव.

शके १८२०

९८

किंमत १२ आणे.

सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत.

सभाग्य मुमुक्षूंना मूर्तिमंत परमार्थरूप.

श्रीज्ञानेश्वरविरचित

अनुभवामृत ग्रंथ.

तात्पर्यबोधिनी नामक गद्यात्मक सुविस्तृत महाराष्ट्र टीकेसहीत.

हा ग्रंथ न्याय–तर्कशास्त्रांतील कोटिक्रम जाणणारे पंडित यांस केवळ कटमण्याप्रमाणें, शहाणे वकील व ब्यारिष्टर यांच्या चातुर्याची ओळख असणारे विद्वान यांस स्वगत सूक्ष्म विचारोद्भव गंभीर आनंदाच्या गुदगुल्या करणारा, तसेंच युक्तिउच्या अबाधित सिद्धांताची माहिती असणाऱ्या कोणाही मनुष्यास आपल्या स्वानुभवसिद्धांतानें आश्चर्यचकित करून सोडणारा, अर्थात्, कोणत्याही तऱ्हेच्या सहृदय वाचकास, तो वाचीत असतां क्षणोक्षणीं स्वानंदलहरीनें समाधि लावून डोलविणारा हा ग्रंथ फारच अप्रतिम आहे. **खऱ्या आर्त मुमुक्षूंना तर हा मूर्तिमंत परमार्थ अथवा शिष्यानुग्रहतत्पर दयाघन सद्गुरुस्वरूप आहे,** असें ह्मणण्यांत अतिशयोक्ति तिळमात्र होणार नाहीं. याचें प्रत्यंतर, ग्रंथ वाचून, सभाग्य ग्राहकांनीं पहावें, एवढी विनंति करण्यापेक्षां अधिक कांहीं लिहवत नाहीं. (ग्रंथाच्या आरंभीं ज्ञानेश्वरमहाराजांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.) किंमत २॥ रुपये. ट. ख. ०२ आणे.

श्रीज्ञानेश्वर महाराजांचें संक्षिप्त चरित्र

व वेदान्ताचीं नित्यसिद्ध अतिसूक्ष्म तत्वें.

मुमुक्षु जनांनीं एकदां तरी हीं तत्वें अवश्य वाचावीं. वरील अनुभवामृत ग्रंथांतून हें पुस्तक मुद्दाम निराळें काढून जिज्ञासू लोकांकरितां निराळेंच मिळण्याची व्यवस्था केली आहे. हें एवढें पुस्तक वाचलें असतां अनुभवामृत ग्रंथांत काय आहे, याची योग्य कल्पना वाचकांस होऊन अनुभवामृत ग्रंथ पाहण्याची उत्कंठा वाढेल. किं० अवघी ०२ आणे. ट. ख. ००६.

ज्ञानेश्वरकृत मुद्राप्रकरण मुकुटमणी व अरूपप्रकाश.

हे लहानसे पण महत्वाचे वेदान्तपर तीनही ग्रंथ एकत्र छापिले आहेत. किंमत ०२ आणे. ट ख. ००६

॥ ॐतत्सत् ॥

श्रीज्ञानदेवविरचित

भक्तराज ग्रंथ प्रारंभः ।

॥ श्रीमहादेवायनमः ॥ ॐ नमोजी अनादि सिद्धा ॥ अनक्षराआनंदकंदा ॥ चिदानंद अभेदा ॥ अविनाशातूं ॥ १ ॥ अजराअमळा अचळा ॥ अद्वैताअखंडाअढळा ॥ अरूपाअसंगाअकळा ॥ अपरंपरातूं ॥ २ ॥ नमोअलक्षाअनाभासा ॥ अनुपम्यास्वप्रकाशा ॥ अप्रमाणआत्महंसा ॥ निरंजनातूं ॥ ३ ॥ निरालंबानिरंतरा ॥ निर्मोहानिर्विकारा ॥ निर्गुणानिराधारा ॥ निरंतरातूं ॥ ४ ॥ नमो व्यापकमहदाकाशा ॥ सदापूर्णसदाभासा ॥ सदोदितासर्वेशा ॥ सर्वादितूं ॥ ५ ॥ प्रपंचाकारप्रकाशक ॥ चराचरआभासक ॥ उत्पत्तिविनाशपाळक ॥ कारणातूं ॥ ६ ॥ तूंएकाचिपरि अनेक ॥ अभेदपरिअनंतदेख ॥ बहुव्यापिबहूनायक ॥ सर्वबीजातूं ॥ ७ ॥ तुवांमृत्तिकेचा करोनिखेळ ॥ उभविलाब्रह्मांडगोळ ॥ संक-

रूपेंहोयमेळ ॥ विकल्पेंनाश ॥ ८ ॥ दाविसी लपाविसीस्वभावें ॥ परिअकर्तायेणेंनावें ॥ चराचरव्यापूनिआघवें ॥ वेगळाचितूं ॥ ९ ॥ जैसारविनानाघटीं ॥ प्रतिबिंबेंबिंबतीकोटी ॥ परिरवितंवशेवटीं ॥ अलिप्ततयां ॥ १० ॥ कां काष्टामाजीलअग्नि ॥ प्रत्यक्षप्रकटेमथनीं ॥ परिकाष्टींअसोनि ॥ वेगळाजैसा ॥ ११ ॥ कांतरूमाजींबीजजैसें ॥ सर्वांगींव्यापुनिअसे ॥ परिवृक्षामाजींनदिसे ॥ वेगळेंचितें ॥ १२ ॥ चंद्रजळींप्रतिभासे ॥ परितोमुख्यगगनींअसे ॥ तैसापरमात्माअसोनिनसे ॥ अलिप्तसकळां ॥ १३ ॥ नातरीवाद्यांच्याठाईं ॥ ध्वनीव्यापूनिअसेपाहीं ॥ परितयामाजींअसोनिनाहीं ॥ नदिसेजैसा ॥ १४ ॥ कंठींरागउमटती ॥ परितेकंठींकायअसती ॥ तैसापरमात्मासर्वभूतीं ॥ परिअलिप्तसकळां ॥ १५ ॥ आरिसांमुखदेखिलें ॥ परिआरिसांनाहींनिघालें ॥ आकाशीं अभ्रप्रकटलें ॥ परिआकाशवेगळें ॥ १६ ॥ ऐसासर्वींसर्वगत ॥ व्यापूनियांविरहित ॥ भक्तिलागींमूर्तिमंत ॥ अमूर्तिहा ॥ १७ ॥ हा

निर्धारितांनानिर्धारे ॥ जगींजगन्नाथजगदाकारें
जगतयामाजींउभारे ॥ विश्वभरित ॥ १८ ॥
तेजींदीपकदीपींतेज ॥ बीजींवृक्षकींवृक्षींबीज
परमात्मातोसहज ॥ जगतयांत ॥ १९ ॥ हा
निर्धारितांनातुडे ॥ मनेंपहातांनसांपडे ॥ क-
वणाहीनघडे ॥ एककींअनेक ॥ २० ॥ परि
आतांऐसेंमानलें ॥ हेंसाभासदिसेजेतुलें ॥ तें
आरिसाचेंउमटलें ॥ प्रतिबिंबजैसें ॥ २१ ॥
कींवृक्षींछायादिसे ॥ तेजाचेनिआभासें ॥
तेजावांचूनिअंधारअसे ॥ ऐसेंनाहीं ॥ २२ ॥
हामायाआकार ॥ मृगजळन्यायेंविस्तार ॥
आभासेपरिसाचार ॥ ह्मणोनये ॥ २३ ॥ क-
ल्पांतींसर्वहीसरे ॥ शेखींनिजरूपजेंउरे ॥ जें
वेदांच्याउत्तरें ॥ बोलवेना ॥ २४ ॥ बिंबआ-
धारेंप्रतिबिंबलें ॥ अनंतहोवोनिआभासलें ॥
असत्यएवंरूढलें ॥ अज्ञानियां ॥ २५ ॥ वोडं-
बरीचेंलेणें ॥ नयनींदिसेसाजिरवाणें ॥ परिजग
मिरवणें ॥ कैसेनिघडे ॥ २६ ॥ स्वप्नींचीकव-
णभेटी ॥ चित्रींचेंकायबोलूंउठी ॥ दर्पणींचाहा-
रकंठीं ॥ कवणमिरवी ॥ २७ ॥ मृगजळाचे-

निजीवनें ॥ तृषाक्रांतेंकैसेनिसंतोषणें ॥ गंधर्व-
नगरींवसणें ॥ हेंकायघडे ॥ २८ ॥ नयनींची
पुतळी ॥ कैसीधरिजेअचळीं ॥ गगनाचिये
पोकळीं ॥ पांगुळधांवे ॥ २९ ॥ वांझेच्या
पुत्रासिविवाहो ॥ सर्पेंकैंगिळिलाब्रह्मकटाहो ॥
हाशब्दजैसावावो ॥ विचारितां ॥ ३० ॥
आकाशाचीसालीकाढिली ॥ वाऱ्याचीचिंधी
फाडिली ॥ आगीलाखंमर्दिली ॥ ऐसेंकायघडे
॥ ३१ ॥ अंधारींचेकाळें ॥ उष्णदेखोनिवाळ
विलें ॥ सर्पाचेपायबांधिले ॥ वाळुवेच्यावेटीं
॥ ३२ ॥ मोटेबांधिलामलयानिळ ॥ चंद्राकिर-
णींपायपोळे ॥ साचहोयएवढाबोल ॥ निर्वा
रितांमिथ्या ॥ ३३ ॥ ज्योतिचेंनिरंगें ॥ वस्त्रें
रंगिलींचांगें ॥ वायूचेनिलागमागें ॥ पांगुळ
धांवे ॥ ३४ ॥ असत्याचिसांत ॥ कायसत्यअ
सेत्यांत ॥ साचह्मणतीभ्रांत ॥ अज्ञानिये ॥ ३५ ॥
ऐसेंअसत्येंचिवाढलें ॥ असत्याचिरूढलें ॥ मा-
गिल्यांसिपुढिलींलाविलें ॥ देखादेखीपां ॥ ३६ ॥
देखादेखीचियेवाटे ॥ मोडतीकुकर्माचेकांटे ॥
आत्मारामनभेटे ॥ श्रीगुरूविण ॥ ३७ ॥ वा-

दकनिंदकदुष्ट ॥ घातकीपातकीनष्ट ॥ उन्मत्त क्रोधीगर्विष्ट ॥ असतीबहु ॥ ३८ ॥ मूर्खआ-णिअनाचारी ॥ मतिमंदअहंकारी ॥ कामातुर महाभारी॥नेणतीसोय ॥ ३९॥ आधींअविचा-रींआंधळीं॥ वरिनेत्रींपरांबांधिलीं॥सैरांचिसो-डूनिदीधलीं ॥ सकळइंद्रियें ॥ ४० ॥ लाग-लींअसत्याचेवाटे ॥ पडिलींप्रपंचाचेपेंठे ॥ दुखियादुःखीभेटे ॥ तरीसुखकैंचें॥४१॥मुकिया मुकेंभेटलें ॥ तरीबोलणेंसहजखुंटलें ॥ आंधळें आंधळ्याझगटलें ॥ तरीदेखावेंकोणें ॥ ४२॥ मिळालापांगुळांचापोवा ॥ तरीमार्गकोणेंउल-गावा ॥ गेलावेडेयांच्यागांवा॥ तरीज्ञानकव-णाआवडे ॥ ४३ ॥ तैसेंझालेंजगासकळा ॥ परिएखादाज्ञाताावेगळा ॥ येरांद्वैतभावशृंखळा ॥ पंथकैंचा ॥ ४४ ॥ मोरासर्वांगींडोळे ॥ परिदेखावयाचेवेगळे ॥ तारांगणींतेजआथिलें परिसूर्याचेंनये ॥ ४५ ॥ पुष्पींपारिमळआहे॥ परितुळसीसमानकायहोये॥ नद्यासरोवरेंपाहे परिभागीरथीवेगळी ॥४६ ॥ आचारचालवि-तीसर्वयाति ॥ परिवेगळीब्राह्मणयाति ॥ क-

ळावंतगातीनाचती ॥ परिवैष्णवप्रेमवेगळें ॥
॥ ४७ ॥ रावरंकएकनांवें ॥ परिवेगळालींपूर्व
दैवें ॥ वनोवनींमृगेंसर्वें ॥ परिकस्तुरियावेगळा
॥ ४८ ॥ पाषाणतरीएकयाती ॥ परिपारिसा
दगडाबहुभ्रांति ॥ तैसेसाधूजगींहोती ॥ परि
तेजगावेगळे ॥ ४९ ॥ येरींआंधळींकायदेखावें
पांगुळींकायचालावें ॥ मुकींकायबोलावें ॥
देखिलेंतऱ्ही ॥ ५० ॥ मिनलीऐसीपंगती ॥
देखोदेखीवर्तती ॥ अवघियांचीगति ॥ एक-
चिदिसे ॥ ५१ ॥ पुढीलनेणोनिआनमार्गधरी
मागिलदेखोनितैसेंचिकरी ॥ परिकोण्हीनवि-
चारी ॥ भक्तिज्ञान ॥ ५२ ॥ व्यसनीस्त्रियेचे
संगतीं ॥ पतिव्रतेचीचळेवृत्ति ॥ कींचांडाळा-
चेसंगतीं ॥ आचारनासे ॥ ५३ ॥ कींकागाचे-
निसान्निधानें ॥ राजहंसवेंचलाप्राणें ॥ कींवि-
ष्टास्पर्शेंपावणें ॥ दुर्गंधीतें ॥ ५४ ॥ कींचोरा-
चियेसंगतीं ॥ शूळपाविजेमहंतीं ॥ कींस्त्रि-
यांचियेसंगतीं ॥ संन्यासीबिघडे ॥ ५५ ॥
कींभेडांमाजीसुभट ॥ धैर्यासीहोयपालट ॥ कीं
आंबिलसंगेंक्षीरघट ॥ नासेजैसा ॥ ५६ ॥ कीं

लोहासंगेंअग्नी ॥ जैसापिटिजेघणीं ॥ त्याचे
निसान्निधानी ॥ नाशुहोय ॥ ५७ ॥ कींपाव-
काचेसंगें ॥ कर्पूरवेंचेसर्वांगें ॥ कींपरास्त्रियाअ-
नुरागें ॥ नासेपुरुष ॥ ५८ ॥ जोव्याघ्रसंगेंराहे
तयामरणतेंचिहोय ॥ कींसर्पासिखेळोंजाय ॥
तोहिनुरे ॥ ५९ ॥ नातरींमैंदाचेसंगतीं ॥
जीवेंगेलेनेणोंकिती ॥ कींभ्रष्टाचेवर्ततांयुक्तीं ॥
भ्रष्टचिहोय ॥ ६० ॥ ऐसेकुसंगेंलागलेप्राणी ॥
त्यासीझालीजीवहाणी ॥ कुसंगाचेगुणीं ॥ व-
र्ततोजेकां ॥ ६१ ॥ सहजबुद्धिविपरीत ॥ न
कळेआपुलेंहिताहित ॥ तयावरीशिकवीत ॥
गुरुकर्मभेद ॥ ६२ ॥ जारणमारणमोहन ॥
स्तंभनआणिउच्चाटण ॥ वशीकरणविध्वंसन ॥
शिकावितीगुरू ॥ ६३ ॥ मंत्रयंत्रउपदेशिती ॥
जगींगुरुत्वामिरविती ॥ वस्तुपारखूंशिकविती ॥
तेहीगुरू ॥ ६४ ॥ दंडायुधभेदूंजाणे ॥ विद्या-
गर्वेंहुंबरणें ॥ तयागुरुत्वमानें ॥ होयपूजा ॥
॥ ६५ ॥ एकाशिकवीएकाशिके ॥ घरोघरींऐसें
चिदेखे ॥ परीनिरासितीसंसारदुःखें ॥ ऐसेकैंचे
॥ ६६ ॥ जेंजेंविषयाचेंगोड ॥ तयाचेंकौतुक

कोड ॥ परिनकरीमनतोड ॥ विषयाहुनी ॥
॥ ६७ ॥ तयाश्रीगुरूचीवोळखी ॥ जोअसंग
संसारसुखीं ॥ आपपरसारिखी ॥ दृष्टीजयाची
॥ ६८ ॥ रावरंकसारिखा ॥ आपलाआणिपा
रिखा ॥ शत्रुआणिसखा ॥ नकरीभेद ॥ ६९ ॥
भुकेंताहाननवोळंबे ॥ सुखदुःखेंनझळंबे ॥ मा-
नापमानगर्वडंबें ॥ चाडनाहीं ॥ ७० ॥ आ-
शाशंकाभेदलोभबुडाला ॥ शंकेविषयींगळाला
गळितपत्रझाला ॥ विषयसंगापासुनी ॥ ७१ ॥
परिकृपाळुपणेंजैशीजननी ॥ जीवमात्रनदुखवी
कोण्ही ॥ निंदास्तुतिदोन्ही ॥ सारिखीजया ॥
॥ ७२ ॥ कांकामींकांचनानातळे ॥ प्रकृती
प्रपंचातेंनमिळे ॥ काळवेळसीनाकळे ॥ श्रीगुरु
तो ॥ ७३ ॥ सदास्वरूपींसावचित्त ॥ हरिख
विषादेंनव्हतोदुश्चित्त ॥ विषयव्यापारींकिंचि-
त ॥ नपालटेबुद्धी ॥ ७४ ॥ विषयव्यापारहो-
य ॥ परिसहजस्थितिनमोडेसोय ॥ अथवा
व्यापारभयें ॥ नडंडळीमन ॥ ७५ ॥ धर्मआ-
चारक्रियाचाले ॥ फळउद्देशींऔदार्यभलें ॥
जगदीश्वरींसमर्पिलें ॥ सकळफळ ॥ ७६ ॥

भूतेंभूमींघालितीघाय ॥ क्लेशनमनीतराहे ॥
तैसाजयाचाभावोहोय ॥ शरीरनिष्ठा ॥ ७७ ॥
भूतभविष्यवर्तमान ॥ जयादेशकाळअसेज्ञान ॥
परिनबोलतीजाणोन ॥ नदावितीलोकां ॥ ७८ ॥
लौकिकींलौकीकसंपादिती ॥ प्रकटनकरिती
आपुलीस्थिती ॥ इहींलक्षणींजेहोती ॥ तश्री-
गुरुजाणावे ॥ ७९ ॥ कस्तुरीचोरिली ॥ तरी
परिमळेंहाटवटीभरली ॥ आगीवोकसांबांधि-
ली ॥ कैसेनिसांठे ॥ ८० ॥ सूर्यगगनींउदेज
ला ॥ तोतळहातेंनवजायेझांकिला ॥ पशुम-
दोन्मत्तबांधिला ॥ लोपेलकैसा ॥ ८१ ॥ गंगे
महापूरभरला ॥ तोकवणासिजायधरिला ॥
तेवींश्रीगुरुआच्छादिला ॥ परिलक्षणेंदाविती
॥ ८२ ॥ रावनसांगेआपणेयातें ॥ परिजग
जाणेतयातें ॥ वर्षलेयापर्जन्यातें ॥ धरीकवण
॥ ८३ ॥ सिंधुकेवींसामावेघटीं ॥ मेरूकेवींल-
पविजेमुष्टीं ॥ वामनरूपसंपुष्टीं ॥ सानेंकैसेंह्म-
णावें ॥ ८४ ॥ दुर्बळांमाजींलक्ष्मीवर ॥ कृप-
णांमाजीउदार ॥ अविचारियांमाजींचतुर ॥
लोपेलकैसा ॥ ८५ ॥ पाडळीफुलाआली ॥ ते

भ्रमररंध्रींठाउकीझाली ॥ मनींकल्पनाउठिली ॥
तेंश्रेष्ठांसिठाउकी ॥ ८६ ॥ तैसींगुरुलक्षणें ॥
तेंप्रसिद्धजगींवाखाणणें ॥ तेंनलगेसांगणें ॥
आतांकांहीं ॥ ८७ ॥ येरांसंसारआवडी ॥
लागेविषयांचीगोडी ॥ उदरशिश्नाचीजोडी ॥
करितातिजग ॥ ८८ ॥ तनुधनाचेनिमाजें ॥
इंद्रियव्यापारेंसदागाजे ॥ भुललींह्मणतीमाझें
माझें ॥ करितीलमिथ्या ॥ ८९ ॥ माक्षिकाकु-
स्थळींराहते ॥ तेणेंसदांदेतृप्तिआंतें ॥ तैसेंवि-
षयसंतोषेंमातें ॥ संतोषले ॥ ९० ॥ पशुवां
तृणाचीगोडी ॥ गोचिडारक्ताचीजोडी ॥ दर्दु-
रचिखलनसोडी ॥ प्रीतीकरोनी ॥ ९१ ॥ क-
र्‍हेंकांटियाखाये ॥ तेणेंतेंसुखपाहे ॥ सूकर
दुर्गंधीलाहे ॥ तेणेंहर्षेंबहु ॥ ९२ ॥ खरांउक-
रडांसराहेमोठी ॥ श्वानहाडांलागींलाळघोंटी
नष्टांजनांचारगोष्टी ॥ आदरबहु ॥ ९३ ॥
दुर्जनांवर्मसांपडे ॥ तेणेंतयापारणेंघडे ॥ नर-
कींकिटकपडे ॥ हर्षबहु ॥ ९४ ॥ ऐसेंविषयां-
चेनिसुखें ॥ सुखमानितीमूर्खें ॥ तेपचिजती
नरकें ॥ बहुसालवरी ॥ ९५ ॥ कर्णींनासला

मृग ॥ घ्राणेंवेंचलाभृंग ॥ दृष्टीनेंजळालापतंग
दीपावरी ॥ ९६ ॥ तरीरमणींव्याघ्रनासला॥
जिव्हेंमीनजीवेंगेला ॥ स्पर्शेंमातंगपाडिला ॥
संसारबंधीं ॥ ९७ ॥ ऐसीविषयांचीगोडी ॥
प्राणीनासलेलक्षकोडी ॥ तयासीकोणसोडी॥
भक्तिज्ञानेविण ॥९८॥ कामिकआणीविरोधी
नेणतीआपुलीशुद्धी ॥ देखादेखीबुद्धी ॥ एक-
चिसकटां ॥ ९९ ॥ मायाजाळेंबांधलीं ॥ शे-
वटींकाळेंखादलीं ॥ विषयकूपींबुडाली ॥ शुद्धि
नाहीं ॥ १०० ॥ विषयसुखाचेचाडें ॥ अवि-
चारअज्ञानवाढे ॥ मगपडतीदाढे ॥ कृतांताचे
॥ १ ॥ ह्मणोनीयाकारणें ॥ वेदशास्त्रपुराणें॥
सांगतातीधांवणें॥ विचारकरा ॥ २ ॥ जाणो-
निझालेसावचित्त ॥ उमजोनिकरितीहित ॥
तयाभाग्यझालेंउदित ॥ उदासीन ॥ ३ ॥
आचारविचारक्रिया ॥ उपकारपुण्यदया ॥
सत्वसत्यभक्तिजया ॥ तोचिधन्य ॥ ४ ॥ मनु-
ष्यदेहउत्तमयाती ॥ सदाचारज्ञानभक्ती ॥
कोंदणावरीजैसीदीप्ती ॥ नवरत्नांची ॥ ५ ॥
गुणाचावरिसुंदर ॥ बरवावरिशृंगार ॥ लक्ष्मी-

वंतआणिउदार कितीवानिजे ॥ ६ ॥ चंदना
वरिमळियानिळ ॥ शौर्यआणिसबळ ॥ छाया
आणिसदांफळ ॥ निकेयानिकें ॥ ७ ॥ औष-
धआणिअतिगोडी ॥ मिष्टान्नवरिंव्यावीफोडी ॥
आपैंआपणातोडी ॥ गुणासिगुण ॥ ८ ॥ सु-
लक्षणआणिचतुरहोय ॥ गुणाचाआणिअति
पढिये ॥ सभाग्यआणिआरोग्यें ॥ तोहिनि-
का ॥ ९ ॥ तैसानरदेहआणिहरिभक्ति ॥ ज-
याअसेसहांचित्तीं ॥ तोचिअमूर्तमूर्ती ॥ मूर्ति-
मंत ॥ ११० ॥ कींआनंदासिफुटलेकोंभ ॥
कींसुखाचासमारंभ ॥ कींधर्मकीर्तीचास्तंभ ॥
उभविलाजगीं ॥ ११ ॥ कल्पवृक्षआंगणींउग-
वला॥कींठेवामाजघरींसांपडला ॥ तैसानरदेह
लाधला भक्तीलागीं ॥ १२ ॥ कींकामधेनुवा-
डांआली ॥ कींलक्ष्मीघररिघाली ॥ कींमेघें
वृष्टीघातली ॥ अमृताची ॥ १३॥ वाटेंचिंता-
मणिसांपडला ॥ कींमनसंकल्पफळाआला ॥
कींपरिसप्रकटला ॥ घरामाजीं ॥ १४ ॥ क्षीर
वोघगंगेआला ॥ कींलोहाचिकनकजाला ॥ कीं
कुबेरदेऊनिगेला ॥ नवहिनिधी ॥ १५ ॥ सा-

घालियाअष्टमासिद्धी ॥ कींरत्नेंलाघलींबिदीं ॥
कींरंकेंबैसिजेइंद्रपदीं ॥ ऐसेंझालें ॥ १६ ॥
परिइंद्रादिकांहरिभक्तिकैंची ॥ खटपटअमर-
पदींची ॥ आराणूकनाहींघडीची ॥ अमरलो-
कीं ॥ १७ ॥ येथेंधर्मकरितीलोक ॥ उत्कृष्ट
झालेयाइंद्रासिधाक ॥ त्यावरिदैत्याचावचक ॥
इंद्रपदजाईलह्मणूनी ॥ १८ ॥ आणिदिक्पा-
ळांकरावेंश्रुत ॥ चालवावेंसृष्टीकृत ॥ आसनीं
असावेंसतत ॥ बैसोनियां ॥ १९ ॥ ह्मणोनि
भक्तिदुर्लभसुरवरां ॥ हेजोडीयेथेंचिकरा ॥ पु-
नरपिपाविजेसंसारा ॥ ऐसेंकेंचें ॥ १२० ॥
हाअवचितांडावपडे ॥ परिमागुतांमोलेंहिना
तुडे ॥ हाविघडिलेयानविघडे ॥ हेंहिलटिकें
॥ २१ ॥ याचेंदुर्लभसाजणें ॥ हेंदुरीलयात्रेचें
पेणें ॥ येथेंपरत्रींचेंकेणें ॥ भरूनिलाभे ॥२२॥
हाभक्तिवद्यहोय ॥ हाजारिनिरर्थकजाय ॥ मग
तोमिळेलकाय ॥ मागितलेयानाहीं ॥ २३ ॥
हेयात्रासंसारींची ॥ पुनरपिनलभेऐशीची ॥
सायासेंलाधलीकैंची ॥ जाणिजेना ॥ २४ ॥
जऱ्हीअवतारझाले ॥ तऱ्हींतेनाहींआले ॥ ए-

जडलेला आणि दररोज रात्रीं नेमका साडेदहाच्या ठोक्यास प्रकट होऊन कांहीं वेळ प्राणांतिक अवस्था करून सोडणारा विकार बळावत चालल्यामुळें डाक्टरांनीं त्यांस लाहोरला जाण्याची परवानगी दिली नाहीं. हा विकार १९०० च्या आगस्टमध्यें जडला. मध्यंतरीं श्री. रमाबाई आजारी पडल्या तेव्हां महिना दीड महिना तो गुप्त झाला होता. दिवाळीच्या सुट्टींत माधवराव एकटेच माथेरानास गेले असतां तेथें त्याचें स्वरूप पूर्वीप्रमाणें प्रकट झालें. दादाभाईसंबंधींचें भाषण संपवितां संपवितां माधवरावांना या रोगाचा झटका दोन तीन मिनिटें सोसावा लागला. पाठीशीं असलेल्या एका खांबाला टेकून त्यांनीं झालेली स्थिति लोकांना दिसूं दिली नाहीं. त्यांना या रोगाची विशेष शंका आल्यामुळें त्यांनीं वैद्यकीचीं पुस्तकें आणवून त्याचा छडा लावला. डाक्टरांप्रमाणेंच त्यांनाही हा रोग म्हणजे मृत्यूचें पाचारण आहे, याची जाणीव झाली होती. या जाणिवेमुळें माधवरावांच्या वृत्तींत उदासीनता पसरली, त्यांनीं आपलें जेवण बत्तीस घासांवर आणून ठेवलें. बोलतांना निरवानिरवीच्या गोष्टी त्यांच्या तोंडून जास्त निघूं लागल्या. वरवर पहाणाराला माधवरावांच्या वागणुकींतला फरक दिसला नसता, पण श्री. रमाबाईनीं त्यांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवून हा फरक ओळखला. फरक लक्षांत आल्यानें त्यांची वृत्ति बावरली व प्रत्यहीं भावी परिणामाच्या चिंतेमुळें त्यांच्या डोळ्यांतून टिपें गळूं लागलीं. डॉक्टर माधवरावांना विश्रांति घेण्याचा सल्ला देत होते, त्याचाच अनुवाद घरांतली मंडळी करीत होती. माधवरावांना हा सल्ला पटला नाहीं. त्यांनीं उरलेल्या दिवसांत एकही क्षण वाया जाऊं नये म्हणून दक्षता राखण्यास

हें मळमूत्राची सांठवण ॥ व्याधीचें अधिष्ठाण ॥ दुर्गंधीचें भुवन ॥ सदां झरे ॥ ३५ ॥ हें नवांठाईं फाटलें ॥ महाविटाळें वेष्टिलें ॥ कामकर्में दाटलें ॥ आंत बाहेरी ॥ ३६ ॥ हें न घडे जाडिलें ॥ मृत्तिकेचें घडिलें ॥ हें योनींचें काढिलें ॥ जग जाणे ॥ ३७ ॥ हें शरीर हाडांची मोळी ॥ वरि मढिलें शिराजाळीं ॥ घातली चर्माची खोळी ॥ दिधले बंध ॥ ३८ ॥ हें अविद्येचें मूळ ॥ प्रपंचाचें स्थळ ॥ व्याधीयोगें व्याकुळ ॥ नासूनि जायें ॥ ३९ ॥ हें योगियांचें सांडें ॥ निश्चय नरकाचें भांडें ॥ हें अशुद्धाचें आडें ॥ शुद्ध कैंचें ॥ ४० ॥ हें त्रिदोषीं दंडिलें ॥ मायाजाळें गुंडिलें ॥ हें जीवें सि मांडिलें ॥ फांसां पडे काळाचे ॥ ४१ ॥ रोग राहिले संधीं ॥ जैसे जन्मांतरींचे द्वंदी ॥ सांपडलेया कधीं ॥ नराखति जीवें ॥ ४२ ॥ निमित्य पाहती कांहीं ॥ परि संयोग घडत नाहीं ॥ राहिले असति ठाईं ठाईं ॥ देहाचि माजीं ॥ ४३ ॥ काळ खर्ग वेउनियां करीं ॥ घावो उचलिला वरी ॥ वेळ आलेया पळ भरी ॥ राहों नेदी ॥ ४४ ॥ हें काळाचा ग्रास ॥ हें अनर्थाचा वास ॥ हें स्वप्नींचा आ-

भास ॥ ऐसेंजाणा ॥ ४५ ॥ हेंअसत्याचेंघर ॥
दुःखाचेंमाहेर ॥ वातापित्ताचेंकोठार ॥ ना-
शिवंतहें ॥ ४६ ॥ हेंशीतेंजंव्याकुळ ॥ अन्न
उदकेंविणाविकळ ॥ दंभलोभेंसकळ ॥ भरलें
असे ॥ ४७ ॥ यासिजन्ममरणाचेआवर्त ॥
पडिलाविषयांचाप्रवर्त ॥ हेंअज्ञानाचास्वार्थ ॥
रचिलाकोडें ॥ ४८ ॥ यासिग्रहोकरितीदंड ॥
शेखींमरणाचाखंड ॥ ऐसाचिरचिलाउदंड ॥
अगडहा ॥ ४९ ॥ हेंचालेतोंचिनवलजाणा ॥
लाहोघेणेंक्षणक्षणा ॥ हादोंदिवसांचापाहुणा ॥
जाईलशेखीं ॥ १५० ॥ कांजायजणींवस्तु
असे ॥ मूर्खराहेत्याचेनिआसे ॥ कांस्वप्नींचें
राज्यजैसें ॥ अवस्थातुरा ॥ ५१ ॥ तैसेंजाण
जगसकळ ॥ माझेंमाझेंह्मणतीबरळ ॥ परि
मृत्तिकेचाखेळ ॥ व्यर्थजैसा ॥ ५२ ॥ मनुष्य
जन्माचीघडी ॥ मागुतीनयेवेंचितांकोडी ॥
हेमहापुण्याचीजोडी ॥ जोडिलीअसे ॥ ५३ ॥
पूर्वीकितिएकहोऊनिगेले ॥ परिमागुतीनाहीं
आले ॥ पुण्यपुरुषार्थउरले ॥ अद्यापिजयांचे
॥ ५४ ॥ एकअतिथांकारणें ॥ वेंचलेअर्थेंप्राणी

प्राणें ॥ एकीं अंगिकारिलीं मरणें ॥ परोपकारीं
॥ ५५ ॥ एकीं कर्वतीं घातलें ॥ आपण अवघडीं
पडिले ॥ एकीं तुळें दिधलें ॥ सुवर्णदान ॥ ५६ ॥
एकीं अंगींचें निमासें ॥ मुखींचे निग्रासें ॥ एकीं
सामास उपवासें ॥ दंडिलें देह ॥ ५७ ॥ एकीं स-
मुद्र खणिला ॥ एकीं ऐरावत आणिला ॥ एकीं रु-
द्र इंद्र जिंतिला ॥ तेही गेले ॥ ५९ ॥ एकीं काविळास
कवळिला बाहीं ॥ त्याचि शुद्धी हीनेण वेकांहीं ॥
विरालें ठांईच्या ठाईं ॥ अभ्र जैसें ॥ ५९ ॥ यु-
गयुगां रोम झडे ॥ तेही झाले काळावर पडे ॥
इतर जीव बापुडे ॥ कोण लेखी ॥ १६० ॥ चौ-
दा कल्पें मार्कंडेयो खंचे ॥ तैं लोमहर्षणाचें रोम
एकवेंचे ॥ तेही गेले ठाईंचे ॥ ठाव सांडूनि ॥
॥ ६१ ॥ ऐसे गेले असंख्यात ॥ तयां काय करूं
गणित ॥ सवालक्ष होत जात ॥ नित्य जेथें ॥ ६२
जेथें महामाया सारिखीं जाती ॥ इंद्रादि कोण
जाणों किती ॥ विष्णु रुद्रा गणती ॥ आणिली
काळें ॥ ६३ ॥ ह्मणोनि जग वाटें जात असे ॥
मोडती ब्रह्मांडाचे ठसे ॥ तेथें राहावयाचें पिसें ॥
लावूनि घेइजे ॥ ६४ ॥ जें जें दिसे तें तें नासे ॥

जैंभासेतैंतैंग्रासे ॥ यासंसाराचेआसे ठकलेबहु ॥ ६५ ॥ यासिप्रमाणकेलें ॥ रविशशिमापारेमलें ॥ निमिष्येंनिमिष्यआणिलें ॥ गणितामाजीं ॥ ६६ ॥ साठीअक्षरेंपळाएका ॥ साठीपळांएकीघटिका ॥ ऐसियासाठीघटिका ॥ ते अहोरात्रएकी ॥ ६७ ॥ ऐशीअहोरात्रीतीस ॥ त्यासिहोयएकमास ॥ ऐसेहोतीदोनिमास ॥ एकाऋतूचे ॥ ६८ ॥ तीनीऋतुएकअयन ॥ दोनीअयनींवर्षजाण ॥ ऐसींशतवर्षेंप्रमाण ॥ मनुष्यायुष्य ॥ ६९ ॥ शतवर्षेंपूर्णअवधी ॥ तयामाजींरात्रिगेलीअर्धी ॥ बाळत्वगेलेंमंदबुद्धी वृद्धत्वपराधीनपणें ॥ ७० ॥ ऐशींहेपंचवीस जाती ॥ मगउरलेंकायाकिती ॥ त्यांतव्याधि दुःखेंनेती ॥ कितीएककाळ ॥ ७१ ॥ किती एकजायउदरपूर्ती ॥ मगकवणेंसमईंकारिसी भक्ती ॥ आणिकाळतंवनित्यीं ॥ सवेंचिहिंडे ॥ ॥ ७२ ॥ फावेलतेव्हांचिनेईलजाण ॥ ह्मणोनि धरीआठवण ॥ घडीभोगेतेआपण ॥ जिंतिली सही ॥ ७३ ॥ त्यागभोगभक्तिज्ञानें ॥ देहो असतांलाहोघेणें ॥ पुनरपिनरदेहायेणें ॥ ऐसें

कायघडे ॥ ८४ ॥ आह्मींमागुतीयेऊन ॥ आ-
पुलीठेवणीघेऊन ॥ हेंसाचह्मणऊन ॥ मानिती
मूर्ख ॥ ७५ ॥ हाअवघासंसार ॥ स्वप्नामध्यें
कनकमेरू ॥ किंचित्रींचानवरत्नहार ॥ कवण
मिरवी ॥ ७६ ॥ कींकागदींचेंधन ॥ कींवेश्येसि
दिधलेंजोडून ॥ कींमेलेयाचेंबरवेंपण ॥ कोण
उपेग ॥ ७७ ॥ भुकेस्वप्नींजेविले ॥ मेले
स्वप्नींदेखिले ॥ कींविकिलेवस्तूसीआपुलें ॥
ह्मणेमूर्ख ॥ ७८ ॥ तैसीशतवर्षेंसंख्या ॥ या-
चीकायसीअपेक्षा ॥ मेलेयाहोयरक्षा ॥ मुष्ठी
एकी ॥ ७९ ॥ कींमातीहोऊनिमातींमिळे ॥
कींविष्टाकरितीखाउनिश्वानकाउळे ॥ कांहोती
कृमीपोटळे ॥ देहावसानसमयीं ॥ ८० ॥ शत
वर्षेंकैंचींबापा ॥ घडीमाजींबुडेलथापा ॥ हा
बोलआलामापा ॥ वेदआज्ञेच्या ॥ ८१ ॥ आतां
चारीलक्षबत्तीससहस्रऐसें ॥ कलियुगप्रमाण
असे ॥ द्वापारत्याचेनिद्विगुणअसे ॥ अधिक
केलें ॥ ८२ ॥ त्रेतबारालक्षसहस्रशाण्णवें ॥
कृतसतरालक्षअठ्ठावीसजाणावें ॥ हेंप्रमाणआ-
घवें ॥ चहूंयुगीं ॥ ८३ ॥ चहूंयुगांचवकडी ॥

तेंब्रह्मयापळाएवढी ॥ ऐशीसहस्रएकचौकडी ॥
तोब्रह्मयादिवसएक ॥ ८४ ॥ ऐसाशतवर्षेंब्र-
ह्मासरे ॥ सहस्रब्रह्मयाविष्णूचीघडीभरे ॥ ऐसे
द्वादशलक्षविष्णुपुरे ॥ तेंवंअर्धप्रहररुद्राचा ॥
॥ ८५ ॥ येणेंगणणेंरुद्रसंख्ये ॥ अकरारुद्रएका
निमीष्यें ॥ तेमहामायाआयुष्यें ॥ वेंचलीं
काळें ॥ ८६ ॥ ह्मणऊनिकाळगणणें ॥ कवण-
हिनुरेसत्यपणें ॥ हेंसर्वदिसेयेझणें ॥ जाईल
जाणा ॥ ८७॥ पृथ्वीआपतेजआकाशवायो॥
एकाचेनिएकाक्षयो ॥ शेखींगगनाहोयलयो ॥
महाशून्यीं ॥ ८८ ॥ शून्यींशून्यविलयागेलें॥
शेवटींतेंचिएकउरलें॥ ज्यासिनांवनवचेठेविलें
वाचाइथा ॥ ८९ ॥ वाचामनमारुती ॥ हें
सर्वहीआरोती ॥ वस्तुतेपरोती ॥ परात्पर ॥
॥ ९० ॥ आहेतेंएकसंचलें ॥ येरदृश्यसर्ववें-
चलें ॥ तेंअक्षरवाचेंवाचिलें ॥ ऐसेंनोहे॥९१॥
हेंनासेचराचर ॥ युगाचेहोतीसहस्र ॥ पुनर-
पिप्रसवअक्षर ॥ प्रपंचाकार ॥ ९२ ॥ हाप्रपं-
चनासेभासे ॥ परब्रह्मजैसेंतैसें ॥ अधिकना
उणेंनादिसे ॥ सदांपूर्ण ॥ ९३॥ तेंचळेनाढळे

उपमेहीनामिळे ॥ अथवादेखतीडोळे ॥ ऐसें नोहे ॥ १४ ॥ तेवातीनाज्योती ॥ नीरनामारुती ॥ गगनाहुनीपरती ॥ वस्तुकांहीं ॥ १५ ॥ तेंनिरामयनिरंजन ॥ अनाक्षरआनंदघन ॥ सदोदीतअप्रमाण ॥ अनिर्वाच्य ॥ १६ ॥ परिपूर्णपरात्पर ॥ स्वप्रकाशनिरंतर ॥ अनामयअगोचर ॥ शुद्धबुद्ध ॥ १७ ॥ वर्णनाव्यक्ती माया ॥ स्वरूपआभासनाछाया ॥ स्थानमानतया ॥ बोलोंचिनये ॥ १८ ॥ तोंनिराभास आभासे ॥ महामायातेथूनिप्रकाशे ॥ तेथब्रह्मांडाचेठसे ॥ पडतीअनंत ॥ १९ ॥ इच्छेपासूनिरचेसृष्टी ॥ जीवजंतूचियाकोटी ॥ अविद्येचियासंबंधेंउठी ॥ तेंचिब्रह्म ॥ २०० ॥ माया संबंधेंशिव ॥ अविद्यासंबंधेंजीव ॥ परब्रह्मीं उद्भव ॥ सर्वहोय ॥ १ ॥ जैसेसुवर्णाचेअळंकारकेले कांउदकाचेषड्सझाले ॥ कींमृत्तिकेचेआकारले नानाघट ॥ २ ॥ कांबहुरूपीनानारूपेंपालटी ॥ परिएकचिआरंभींशेवटीं ॥ कांजळायेपोटीं ॥ नानातरंग ॥ ३ ॥ कींघटमठींगगनएकलें ॥ व्यापकपरिकोठेंनाहींगुंतलें ॥ कींदीपींतेजउ-

जळलें ॥ तेंएकचिजैसें ॥ ४ ॥ कींएकाबीजा-
चाचिविस्तार ॥ तोअनंतबीजझालातरू ॥ प-
रमाणूचाकोडीभार ॥ परिपृथ्वीएकी ॥ ५ ॥
एकजळअनंताघटीं ॥ एकरविप्रतिबिंबेंकोटी ॥
तैसेंएकब्रह्मसकळसृष्टी ॥ रचिलीअसे ॥ ६ ॥
एकबूडअनंतशाखा ॥ एकशब्दअनंतभाषा ॥
तैसीएकवस्तुअनंतलोकां ॥ विस्तारझाला ॥
॥ ७ ॥ अनंतवर्णगाईएकक्षीर ॥ अनंतरंगप-
रिएकचिर ॥ अनंतलोकींएकनगर ॥ रचिलें
जसें ॥ ८ ॥ एकीमायाअनंतशक्ती ॥ एकदेव
अनंतभक्ती ॥ एकीबुद्धीअनतवृत्ती ॥ उठती
देहीं ॥ ९ ॥ ऊसरसगुळसाखर ॥ एकचिगो-
डीपृथगाकार ॥ तैसेंएकब्रह्महाविस्तार ॥ त्या
चाचिपैं ॥ १० ॥ आतांजनींवनींजनार्दन ॥
तयासिनाहींभेदाभिन्न ॥ तरीमायाजाळेंकवण ॥
बांधिलाजाये ॥ ११ ॥ स्वर्गींकवणराहे ॥
नरककवणलाहे ॥ ब्रह्मतेंकायआहे ॥ हेंहीन
कळे ॥ १२ ॥ आहेजैसेंएकजळ ॥ सिंधुसरि-
तावोहळ ॥ उत्तमअमंगळ ॥ सारिखेंजया ॥
॥ १३ ॥ कांकांचनएकजैसें ॥ भूषणभूषणा

वेगळेंदिसे ॥ बावन्नेंचिप्रकाशे ॥ चढेनातुटे ॥
॥ १४ ॥ जैसेंआपुलेंदेहपाहे ॥ नानाअवस्था
घेतआहे ॥ कुमारत्वतारुण्यजरीलाहे ॥ तैसी
सकळप्रमाणें ॥ १५ ॥ गारतंवएकजाती ॥
हिरेरत्नेंनानादिसती ॥ परिसचिंतामणिअस-
ती ॥ गारेचिमाजीं ॥ १६ ॥ ऐसाएकचिन-
टला ॥ बहुरूपींप्रगटला ॥ थोरसानांवाटला॥
अज्ञानियां ॥ १७ ॥ मुंगीपासूनिब्रह्मवरी ॥
ज्ञानियाएकाचिनिर्धारीं ॥ आणिकृष्णेंगीतेमा-
झारीं ॥ हेंचिअर्जुनानिरोपिलें ॥१८॥ अर्जु-
नासिसांगेहरी ॥ मींचिअसेचराचरीं ॥ उत्प-
त्तिस्थितिसंहारी॥मीचिएक॥१९॥मीचिरुद्रहो
वोनिमारी॥ब्रह्माहोवोनिआकारीं॥विष्णुरूपध
री॥प्रतिपाळणीं॥२०॥ मीनिराकारआकारलों
मीसगुणहोवोनिठेलों ॥ मीअमूर्तमूर्तीआलों॥
निर्गुणाचा ॥ २१ ॥ चहूंखाणींमींचिअसें ॥
परिअज्ञानियांकेवींदिसे ॥हाप्रपंचमाझेनिअंशें
साचझाला ॥ २२ ॥ हेअज्ञानजीवबापुडे ॥
वैष्णवहोऊनिशिवाशींवांकुडे ॥ शैवहोऊनिम-
जकडे ॥ नपाहती ॥ २३ ॥ याअज्ञानियां-

कारणें ॥ मजसायासपडतीकरणें ॥ नानाअव-
तारधरणें ॥ याचिलागीं ॥ २४ ॥ तोमजशि-
वाभेदधरी ॥ तोअसुरप्रकृतीपुरी ॥ तोमजसीं
दुरी ॥ अधमयाती ॥२५॥ एकपायींपूजाकरी
दुसराचरणअमंगळधरी ॥ अर्धांगशीणवारी ॥
अर्धतैसेंचिराखे ॥ २६ ॥ तैसीमाझीस्तुतीकरी
आणिशिवाचीनिंदाउच्चारी ॥ त्यादोन्हीमजचि
वरी ॥ निंदास्तुती ॥ २७ ॥ अहंशरीरशिवा-
त्मा ॥ शिवशरीरअहमात्मा ॥ हेंनेणेतोजन्मा
वरपडाहोय ॥ २८ ॥ आणिजगमजमाझारीं ॥
मींजगाच्याअंतरीं ॥ हेंप्रकटकरी ॥ भेदज्ञान॥
॥ २९ ॥ हाकृष्णार्जुनसंवाद ॥ प्रसंगेंकेला
अनुवाद ॥ ह्मणोनिहाभेद ॥ अज्ञानियां॥३०॥
ह्मणोनिसर्वब्रह्मनिरांजन ॥ सदोदीतपूर्णघन॥
मायाअविद्याउत्पन्न ॥ तेथेंचिझाल्या ॥ ३१ ॥
जैसेंजळबाबुळीतें०याले ॥ कींआकाशींअभ्रप्र-
कटलें ॥ तैसेंमायाअविद्येचेंउठिलें ॥ आंतबा-
हेरीपरब्रह्म ॥३२॥ कींसूर्यापासावमृगजळ ॥
कींदृष्टीपासोनिकवळ ॥ तैसेंमायाअविद्येचेंप-
टल ॥ उठिलेंपरब्रह्मीं ॥ ३३ ॥ तेथोनिप्रपंच

विस्तारला ॥ बाहेरीअंतरींब्रह्मेंचिव्यापला ॥
ह्मणोनिब्रह्मचिह्मणतीयाला वेदशास्त्रें ॥ ३४॥
ब्रह्मेणउत्पत्तिकैंची ॥ होयमायाप्रपंचाची ॥
ब्रह्मावेगळेंकरितांयाची ॥ उरीनुरे ॥ ३५ ॥
सूर्यवेगळांकीजे ॥ मगप्रभापाहिजे ॥ तंवदो-
नींहीसहजें ॥ एकचिजाण ॥ ३६ ॥ दीपवे-
गळाकरावा ॥ मगउजेडधरावा ॥ तवंदीपास-
रिसासांडावा ॥ त्याचाचिकींहोय ॥ ३७ ॥
आतांपुष्पांचियापारिमळा ॥ कैसाकरूंपुष्पा-
वेगळा ॥ रत्नापासोनिकिळा ॥ निवडिजेकैसी॥
॥ ३८ ॥ गुळापासोनिगोडी ॥ वेगळीकवण
निवडी ॥ रूपापासोनिदवडी ॥ साउलीकवण
॥ ३९ ॥ आत्माआणिकुडी ॥ जैसीयांचीगोडी
तैसीमायानसोडी ॥ परब्रह्मातें ॥ ४० ॥ दों
नेत्रींएकदेखणें ॥ दोंकरींएककरणें ॥ दोंकानीं
ऐकणें ॥ एकनाद ॥४१ ॥ दोंपायींएकचालणें
दोंवोठींएकबोलणें ॥ द्वैतभावेंपाहणें ॥ एकप-
णेंनघडे ॥ ४२ ॥ द्वैतभावेंदोंहीपरिएकवस्तु॥
तैसादोंहीपासूनिउभारत ॥ प्रपंचींभक्तिवाद
द्दैत ॥ नघडेकदां ॥ ४३ ॥ याब्रह्मामाजींवा-

ढती ॥ नासलियात्यांतचिविरती ॥ ह्मणोनि
सर्वब्रह्मह्मणती ॥ वेदमतें ॥४४॥ सूर्यापासूनि
अग्नि॥आणिसूर्यापासूनिपाणी ॥ तैसाउत्पत्ती
नाशदोनी॥ ब्रह्मचिमूळ ॥४५॥ प्रपंचउपजोनि
कायझाला॥ आणिनासोनिकोठेंगेला॥परब्रह्मीं
संचला ॥ यथास्थिती ॥४६ ॥ जळींतरंगहोती-
जाती ॥ आणिजळींचनाशउत्पत्ती ॥ परिजळीं
नाहींआकृती ॥ तेंजैसेंतैसें ॥४७॥ दिवेदिवटी
आगिटी ॥ अग्निविचरेनानाघटीं ॥ परिमुख्य
तोशेवटीं ॥ अधिकनाउणा ॥ ४८ ॥ मृत्तिके-
चीनानाभांडीं ॥ घडीमोडीखंडोखंडी ॥ पारि
मृत्तिकेवांचोनिवाढी ॥ नव्हेकांहीं ॥ ४९ ॥
ऐसेंसकळचराचर ॥ ब्रह्माचिपासूनिअंकुर ॥
विरालियासर्वत्र ॥ ब्रह्मचिअसे ॥ ५० ॥ अ-
थवाअळंकारघडेमोडे ॥ परिसुवर्णनतुटेनचढे॥
तैसीपरब्रह्मींनपडे ॥ भूतांचिबाधा ॥ ५१ ॥
अविद्येचेंअन्यथाज्ञान ॥ नाथिलेंदिसेद्वैतपण ॥
हेंएकभक्तिज्ञान- ॥ वांचूनिनकळे ॥ ५२ ॥
जरीहोयशुद्धज्ञान ॥ तरीनाशेअविद्याभान ॥
मगसहजसंसारस्वप्न ॥ नासूनिजाये ॥ ५३ ॥

जैसादोरीचासर्पआभासे ॥ तोअज्ञानांसाच
दिसे ॥ भ्रांतिफिटलियाजैसें ॥ साचदिसेदो-
री ॥ ५४ ॥ जोजिंतिलाकवळे ॥ कांउन्मत्त
द्रव्यैंभूलले ॥ आपआपणियांविसरले ॥ भ्रम-
लेमूर्ख ॥ ५५ ॥ रोगेंभुललाप्राणी ॥ तोदोन
चंद्रदेखेगगनीं ॥ कांस्वप्नसाचमानीं॥स्वप्नाचि
माजीं ॥ ५६ ॥ कांशेतींचेंबुजवणें॥ तेंमनुष्य
ह्मणतीअज्ञानें ॥ तैसेंदिसेअन्यथाज्ञानें ॥ तें
अज्ञानह्मणिजे ॥५७॥ तप्तलोहदेखोनिश्वानें ॥
तेंमांसह्मणतीआपुलेनिज्ञानें ॥ परिजाणतया-
चेंदेखणें ॥ वेगळेंची ॥ ५८ ॥ रूचीकदेखोनि
पांढरा ॥ दहींवाटलेंमांजरा ॥ परिजाणतया-
च्याविचारा ॥ तैसेंनदिसे ॥ ५९ ॥ सूकराचे
याद्दष्टी ॥ अवघीआमुचीचसृष्टी ॥ पशुपक्षि-
यांचेपोटीं ॥ आनआनबुद्धी ॥ ६० ॥ जीव
अज्ञानेंभ्रमले ॥ तिहींविपरीतसाचकेलें ॥ देह-
अभिमानेंबुडाले ॥ भवसागरीं ॥ ६१ ॥ जा-
तिचेनिअभिमानें ॥ विषयांचेनिअनुसंधानें ॥
अज्ञानासिअज्ञानें ॥ ज्ञानीचह्मणती ॥ ६२ ॥
जंवअज्ञाननतुटेमनीं ॥ तंवज्ञानासिसाचकाच

मानी ॥ जैसेंस्वप्नसाचस्वप्नीं ॥ पारिजागिले-
यालटिकें ॥ ६३ ॥ ऐसीस्वजातिअभिमानें ॥
देहींदेहभिन्नज्ञानें ॥ तेंअज्ञानेंचिह्मणणें ॥ पर-
मज्ञान ॥६४॥ ज्ञानतेंयथार्थ ॥ पिपीलिकेपा-
सूनिब्रह्मपरियंत ॥ सर्वसारिखेंदिसत ॥ चरा-
चर ॥ ६५ ॥ मशकमातंगसारिखा ॥ तैसें-
चिरायाआणिरंका ॥ सिंहआणिजंबुका ॥ न
करीभेद ॥ ६६ ॥ हंसआणिकाक ॥ उत्तमअ-
थवाअनामिक ॥ पंडितआणिमूर्ख ॥ नकरी
भेद ॥ ६७ ॥ सदैवकांदुर्बळ ॥ पराक्रमीकां
निर्बळ ॥ सुवर्णआणिढेंकूळ ॥ सारिखेंचिजया
॥ ६८ ॥ रत्नअथवाखडा ॥ चतुरकांवेडा ॥
चंदनआणिएरंडा ॥ नमानितीकांहीं ॥ ६९ ॥
निंदाअथवास्तुती ॥ क्षुधाकांतृप्ती ॥ भूमीआणि
सुपेती ॥ सारिखीजया ॥ ७० ॥ घरअथवा
वन ॥ वस्त्रकांनग्न ॥ मानकांअपमान ॥ सारि-
खाजया ॥ ७१ ॥ लज्जाकांभेणें ॥ घेणेंअथवा
देणें ॥ जाणेंअथवाराहणें ॥ कांहींचनेणे ॥७२॥
भोगकांत्याग ॥ लोभकांराग ॥ वाईटकांचांग
नह्मणेकांहीं ॥ ७३ ॥ एकींनिंदानिंदिले ॥

एकींस्तुतीकरूनिवंदिलें ॥ सारिखेंचिमानिलें॥ दोघांतयां ॥ ७४ ॥ ऐसेंअखंडअभेदज्ञान ॥ तयांनाहींथोरलहान ॥ तेजगामाजींधन्य ॥ तिहींलोकीं ॥ ७५ ॥ परिसखगेंहाणितला ॥ परिइतरनाहींतयाला ॥ सोनेंचिखर्गकेला ॥ लोहोजन्म ॥ ७६ ॥ ऊसमोडोनिसोलिला ॥ तोडोनियांगाळिला ॥ कढईघालूनिजाळिला ॥ परिनसंडीगोडी ॥ ७७ ॥ चंदनकरवतींफोडिला ॥ साहाणेवरीतोडिला ॥ परिनाहींसोडिला ॥ शीतळतावास ॥ ७८ ॥ पुटींजाळिले याबावन्नें ॥ परिअधिकचिदावणें ॥ तैसासाधु देहअवसानें ॥ पालटनाहीं ॥ ७९ ॥ ऐसे अढळनढळतीमनें ॥ सुखदुःखेंतन्मयज्ञानें ॥ तयाचेनिचरणदर्शनें ॥ हरेपापताप ॥ ८० ॥ शरीरभावींअलिप्त ॥ लोभमोहेंविरक्त ॥ जैसें कमळिणीपत्रउदकांत ॥ असोनियांनातळे ॥ ॥ ८१ ॥ देहाचेनिअनुसंधानें ॥ देहाजन्ममरणयेणेंजाणें ॥ परिआत्मयायेसणें ॥ बोलोंचिनये ॥ ८२ ॥ हाउपजेनामरे ॥ सांपडेनाधरे ॥ वोहटेनाभरे ॥ सदांसारिखाचितो ॥

॥ ८३ ॥ हानतुटेनजळे ॥ नाकळेनढळे ॥ हा आपुलेस्वलीळे ॥ वर्तेचराचरीं ॥ ८४ ॥ स्वर्ग नर्कहिंडणें ॥ बद्दमुक्तहोणें ॥ हेंयाचेंचिकरणें वाढविलेंयेणें ॥ ८५ ॥ अविद्याआंगींजडे ॥ तैंअधोगतीघडे ॥ जीवपणजोडे ॥ नाथिलेंची ॥ ॥ ८६ ॥ हामहामायासंगें ॥ फळेसप्तहीस्वर्गें शिवपणभोगे ॥ याचेंयासी ॥ ८७ ॥ जरी मायाअविद्यासोडी ॥ स्वस्वरूपींलागेगोडी ॥ तेधवांसायुज्यतारोकडी ॥ याचीयासी ॥ ८८ ॥ जैसेंएकचिपाणीं ॥ सिंधुसरितापोखरणीं ॥ परिप्रळयोदकींकैसोनि ॥ निवडोंजाणें ॥ ८९ ॥ हाजेजेठाईंबैसे ॥ तेधवांरूपधरीतैसें ॥ परिमुदळजेंअसे ॥ तेंचिशेखीं ॥ ९० ॥ हाबहुरूपी ह्मणिजे ॥ यातेंयाणेंचिजाणिजे ॥ याचेंस्वरूप याउमजे ॥ ऐसाचिहा ॥ ९१ ॥ दीपकजरी पहावा ॥ तरीत्याच्याप्रकाशेंदेखावा ॥ कां सूर्योपाहूंजावा तरितोचिदावी ॥ ९२ ॥ मुख जरिपाहिजे ॥ तरिमुखेंचिमुखदेखिजे ॥ वांचोनिआरिसादाविजे ॥ कायकोणें ॥ ९३ ॥ रायासिजरिपहावें ॥ तरिआपणासीचदाखवा-

वें ॥ वांचूनिदुसरेंदेखावें ॥ कायरायें ॥९४॥
तैसेंयेथेंपहावया ॥ निमित्तदेखावया ॥ वां-
चूनिप्रपंचीककाया ॥ देखोंनसके ॥ ९५ ॥
रूपेंरूपलक्षिजे ॥ नयनींनयनदेखिजे ॥ मुखा-
चाचिआरिसाकीजे ॥ यामुखासी ॥ ९६ ॥
हाचिदावीहाचिदेखे ॥ हाचिआरिसाहाचि
मुखें ॥ द्रष्टादृश्यदर्शनींएकें ॥ येणेंचिआसिजे
॥ ९७ ॥ हाडोळेयांचाडोळा ॥ हासुखाचा
सोहाळा ॥ याचेयातुकेंतोला ॥ हाचिएक ॥
॥ ९८ ॥ हाबहुरूपाचेनिखेळें ॥ अहंताधरीप्र-
पंचमेळें ॥ ह्मणोनिस्वस्वरूपींठेलें ॥ दुश्चिते-
पण ॥ ९९ ॥ गीताज्ञानदेवींटीका ॥ संस्कृता-
चीआइका ॥ कृष्णेंअर्जुनासिदेखा ॥ हेंचि
निरोपिलें ॥ ३०० ॥ ग्रंथानामभक्तराज ॥
मराठाझालासहज ॥ भक्तिभावेंचिंतूनतूज ॥
अखंडहृदयींअसावें ॥ ३०१ ॥ इतिश्रीभक्तराज
ग्रंथ ॥ ज्ञानेश्वरविरचित ॥ सकळसंशयाचा
हेत ॥ नासेश्रवणमात्रेंचि ॥ ३०२ ॥ इतिश्री
भक्तराजग्रंथसंपूर्ण ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥छ॥

विचार करून ध्यानांत ठेवण्यासारखे अभंग

॥ श्रीज्ञानदेव ॥

मेल्यावरी मोक्ष आह्मांसी होईल ॥ ऐसें जें ह्मणतील ते अतिमूर्ख ॥ १ ॥ दीप गेल्यावरी कैचा गा प्रकाश ॥ झाकापाकी त्यास कासयाची ॥ २ ॥ जंववरी देह आहे तंववरी साधन ॥ करूनिया ज्ञान साधिजे कीं ॥ ३ ॥ गृह न जळतां शिंपीजे उदक ॥ शेखीं तें निष्टंक काय कीजे ॥ ४ ॥ आहे मी हा कोण करावा विचार ॥ ह्मणे ज्ञानेश्वर अनुभवें ॥ ५ ॥ ॥ ॥ ॥ ॥

एकाच मीपणें नागविलें घर ॥ नातरी संसार ब्रह्मरूप ॥ १ ॥ प्रवृत्तिनिवृत्ति दोनी मुळीं नाहीं ॥ कल्पनेनें पाहीं भ्रमताती ॥ २ ॥ ते एक त्यागितां काय आहे उणें ॥ कैवल्यासी धणी तोचि होय ॥ ३ ॥ जन्म मृत्यु भोग भोगणें यालागीं ॥ ठावूनिया संगीं राहे बापा ॥ ४ ॥ ह्मणे ज्ञानदेव मग होसी मुक्त ॥ नव्हेसी अशक्त सर्वथैव ॥ ५ ॥

॥ पद. ॥

सोही कच्चावे कच्चावे ॥ नही गुरूका बच्चा ॥ ध्रु० ॥ दुनिया त्यजकर खाक लगाई, जाकर बैठाबनमो ॥ खेचरिमुद्रावज्रासनपर ध्यान धरत है मनमो ॥ सोहीक०॥१॥ गूपत होकर परगट होवे, जावे मथुरा काशी ॥ प्राननिकाले सिद्ध भया है, सत्यलोकका वासी ॥ सोही कच्चावे०॥२॥ तीरथकरकर ऊमर खोई, जोग जुगतमो सारी ॥ धनकामिनिकों नजर न लावे, जोग कमाया भारी ॥ सोही कच्चावे० ॥ ३ ॥ कुंडालिनीकों खूब चढावे, ब्रह्मरंध्रमो जावे ॥ चलता है पानीकेऊपर, मुखबोलेसो होवे ॥ सोहि कच्चावे० ॥ ४॥ शास्तरमो कछु रही न बाकी, पूराग्यान कमाया ॥ वेदाविधीकामारग चलकर, तनका लकराकिया ॥ सोही कच्चा० ॥ ५ ॥ कहे मछिंदर सुनरे गोरख, तीनो ऊपर जाना ॥ कृपाभई जब सद्गुरुजीकी, आपआपकू चिन्हा॥सोही सच्चावे सच्चावे ॥ सोहि गुरूका बच्चा ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥ ॥